आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच.ओ.D0E3e
दिनांक.23/03/2020

- आदेश -

**विषय –** **डॉ नायडू रुग्णालय व सर्व क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) येथील अवास-प्रवास नियंत्रित करणेबाबत.**

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे मनपाचे डॉ नायडू रुग्णालय येथे कोरोना बाधित/संशयित रुग्ण व विविध क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) येथे परदेशातून प्रवास करून आलेल्या व्यक्तींना ठेवण्यात आले आहे.

डॉ नायडू रुग्णालय व विविध क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) येथील अवास-प्रवास नियंत्रित करणेकरीता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सदर ठिकाणी अनावश्यक वाहने उभी करून दिली जाऊ नयेत.
२. अनावश्यक वाहनांना व व्यक्तीना प्रवेश देऊ नये.
३. संबंधित सुरक्षा रक्षकांनी येथे येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची नोंद वहीमध्ये नोंद घ्यावी.
४. उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन यांनी प्रमाणित केलेल्या परदेशातून पुणे शहरात आलेल्या व्यक्तींचे यादीमधील व्यक्ती व उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय यांनी प्रमाणित केलेल्या घरी अलगीकरणाकरीता पुरेशा जागा (स्वतंत्र खोली) नसलेल्या यादीमधील व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस व वाहनास सदर ठिकाणी प्रवेश देऊ नये.
५. विशेष परिस्थिती उद्भवल्यास आरोग्य अधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही वाहनास अथवा व्यक्तीस सदर ठिकाणी प्रवेश करू देऊ नये.

कळावे.

(शन्तनु गोयल)
अति.महा.आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका

प्रत –
१.मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा.
२.मा. अति.महा.आयुक्त (जनरल), पुणे मनपा.

यांजकडेस माहितीसाठी.

प्रति –
१. सर्व संबंधित मा. खाते प्रमुख, पुणे मनपा.

Scanned with CamScanner